दिनेश
बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
खडी, क्रेशन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587

# दैनिक आकर्षण

संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक २८० । शुक्रवार ७ ऑगस्ट २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

## भिडे गुरुजींची शनिवारी नगर शहरात विशेष बैठक

### श्रावण मासातील शिवचरित्र पारायणाबाबत होणार नियोजन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पवित्र श्रावण महिन्याचे औचित्य साधून श्री शिवचरित्र पारायण या उपक्रमाच्या नियोजनासाठी श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे संस्थापक संभाजीराव भिडे गुरुजी यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्या, शनिवारी विशेष जिल्हा बैठकीचे नगर शहरात आयोजन करण्यात आले आहे.

ही बैठक शनिवार, दिनांक ८ ऑगस्ट रोजी सकाळी नऊ वाजता स्टेशन रोडवरील स्वस्तिक चौकातील राजयोग हॉल येथे पार पडणार आहे. ‘‘करू कार्य असे उभा देश जागे, असंख्यास वाटे चला जाऊ मागे‘‘ या ब्रीदवाक्याला अनुसरून राष्ट्रात शिवविचारांचे जाळे निर्माण करणे हा या बैठकीचा मुख्य उद्देश आहे.



या बैठकीमध्ये श्रावण महिन्यात आयोजित केल्या जाणाऱ्या शिवचरित्र पारायण उपक्रमाची रूपरेषा ठरवण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सर्व हिंदुत्ववादी तरुणांनी भारतीय टोपी परिधान करून बैठकीच्या वेळेच्या १० मिनिटे आधी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान नगर शहरच्या वतीने करण्यात आले आहे.

## श्रमिक संघटना व ऑटो-रिक्षा संघटनेचा १५ ऑगस्टपासून आंदोलनाचा इशारा



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर जिल्हा श्रमिक संघटित कष्टकरी कामगार संघटना आणि अहिल्यानगर जिल्हा ऑटो रिक्षा व टॅक्सी चालक-मालक संघटनेच्या वतीने विविध मागण्यांसंदर्भात जिल्हाधिकारी तसेच पोलीस अधीक्षक यांना निवेदन देण्यात आले. या वेळी संघटनेचे जिल्हाध्यक्ष विलास कराळे पाटील यांच्या नेतृत्वाखाली पदाधिकाऱ्यांसह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

निवेदनात शहर व उपनगरांमध्ये कथितरित्या केमिकलयुक्त दूध तसेच विनालेबल व अनधिकृत प्लास्टिक पिशव्यांमधून दूध व दुग्धजन्य पदार्थांची विक्री होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. अशा विक्रीवर संबंधित यंत्रणांकडून प्रभावी कारवाई होत नसल्याचा दावा संघटनेने केला असून याबाबत तातडीने कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय, प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) व उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात एजंट आणि दलालांच्या माध्यमातून वाहनधारकांची आर्थिक लूट होत असल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. वाहनांच्या विविध कामांसाठी दलालांची साखळी कार्यरत असून त्याची चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी संघटनेने केली आहे.

अहिल्यानगर शहरात मोठ्या

■ पान ४ वर

## मंगळसूत्र चोरणारे दोन सराईत चोरटे गजाआड

### एलसीबीच्या कारवाईत ६ लाखांची कार जप्त

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** संगमनेर तालुक्यात पत्ता विचारण्याच्या बहाण्याने महिला फिर्यादीचे मंगळसूत्र आणि सोन्याचे दागिने जबरीने चोरणाऱ्या दोन आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेने जेरबंद केले आहे. या कारवाईत गुन्ह्यात वापरलेली ६ लाख रुपये किमतीची बलेनो कार जप्त करण्यात आली आहे.
दिनांक २ ऑगस्ट २०२६ रोजी
सकाळी साडेनऊच्या वाजेच्या सुमारास



काकडवाडी (ता. संगमनेर) येथील रहिवासी तुळसाबाई संपत शिरसाठ या बाहेरगावी जाण्यासाठी बसची वाट पाहत उभ्या होत्या. त्यावेळी अज्ञात चोरट्यांनी ■ पान ४ वर



ज्येष्ठ हवामान अभ्यासक डॉ.पंजाबराव डख यांनी माळीवाड्यातील श्रीपाद ज्वेलर्सला सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी श्रीपाद शहाणे यांनी त्यांचा सत्कार केला समवेत श्री मधुकर शहाणे श्री करण डहाळे.

## भाजप अनुसूचित जमाती मोर्चाच्या प्रदेश कार्यकारिणीवर गिरीश चव्हाण यांची निवड

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** भारतीय जनता पार्टी अनुसूचित जमाती मोर्चाच्या महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली असून, यामध्ये नगर येथील गिरीश चव्हाण यांची प्रदेश कार्यकारिणी सदस्यपदी निवड झाली आहे. प्रदेशाध्यक्ष डॉ. देवराव एम. होळी आणि प्रभारी आमदार योगेश सागर यांच्या मान्यतेने ही निवड जाहीर करण्यात आली.

गिरीश चव्हाण यांनी आदिवासी समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी आणि पक्षसंघटन बळकट करण्यासाठी नेहमीच सक्रिय योगदान दिले आहे. त्यांच्या या निवडीमुळे नगर जिल्हा व परिसरातून आनंद व्यक्त केला जात आहे.

आपल्या निवडीबद्दल बोलताना, भाजपचे वरिष्ठ नेतृत्व आणि प्रदेशाध्यक्षांनी दाखवलेला विश्वास सार्थ ठरवत अनुसूचित जमाती घटकांच्या कल्याणासाठी आणि पक्षाची ध्येयधोरणे तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी कटिबद्ध राहू, असा विश्वास गिरीश चव्हाण यांनी व्यक्त केला. त्यांच्या या निवडीबद्दल विविध स्तरातून आणि भाजप पदाधिकाऱ्यांकडून त्यांचे अभिनंदन होत आहे.

## रांजणगाव एमआयडीसी खून प्रकरण, दोन फरार आरोपी एलसीबीकडून जेरबंद



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** रांजणगाव एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या खून प्रकरणातील फरार असलेल्या दोन आरोपींना अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शिताफीने ताब्यात घेतले आहे. दीपक सतीश मुंडे (वय २२) आणि चैतन्य गोरक्ष जायभाये (वय २१, दोघेही रा. पिंगेवाडी, ता. शेवगाव, सध्या रा. अहिल्यानगर) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

दिनांक ४ ऑगस्ट २०२६ रोजी फिर्यादी प्रतीक बबन खैरे (रा. देवाऱ्याची वाडी, जि. बीड) हे त्यांचे साथीदार दत्ता बबन पवार यांच्यासह ट्रेलर्समधून जालन्याहून पुण्याच्या दिशेने लोखंडी रॉड घेऊन जात होते. या दरम्यान रांजणगाव एमआयडीसी परिसरात आरोपी देवा खेडकर व त्याच्या साथीदारांनी कारमधून येऊन ट्रेलर अडवला. आरोपींनी लाकडी दांडके, जाड वायर आणि लोखंडी रॉडने दत्ता पवार यांच्या डोक्यात व पाठीवर प्राणघातक हल्ला केला, ज्यामध्ये त्यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी रांजणगाव एमआयडीसी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम १०३ व १०९(२) अन्वये खुनाचा गुन्हा दाखल आहे.

पुणे ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेने गुन्ह्याचा तपास करत आरोपींची नावे निष्पन्न केली व अहिल्यानगर पोलिसांशी संपर्क साधला. अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक अनंत सालगुडे व पथकाने ६ ऑगस्ट रोजी गुप्त बातमीदार आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे कारवाई करत दोन्ही आरोपींना ताब्यात घेतले. पुढील तपासासाठी आरोपींना पुणे ग्रामीण गुन्हे शाखेच्या हवाली करण्यात आले आहे.

## शिर्डी शहरात व परीसरात दहशत निर्माण कराणारा सराईत गुन्हेगार एमपीडीए कायदयान्वये स्थानबध्द जिल्हादंडाधिकारी आदेश

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**शिर्डी–** शिर्डी शहरात राहणारा अनिकेत उर्फ झिंग्या सुनिल शेजवळ, वय २८ वर्षे, रा. भिमनगर, शिर्डी, ता. राहाता,जि.अहिल्यानगर याने शिर्डी पोलीस स्टेशन हद्दीत गैर कायदयाची मंडळी जमवुन खुनाचा प्रयत्न करणे, गंभीर दुखापत करणे, अपहरण करुन खुनाचा प्रयत्न करणे, जमाव बंदी आदेशाचे उल्लंघण करणे व अश्लील कृत्य करणे असे गंभीर स्वरुपाचे शरीराविरुध्दचे गुन्हे करुन तेथील राहणारे सर्व सामान्य लोकांवर दहशत निर्माण केलेली होती.

त्यामुळे शिर्डी शहरात तसेच आजुबाजुच्या परिसरात सार्वजनीक सुव्यवस्थेस बाधीत झाली होती. सराईत गुन्हेगार अनिकेत उर्फ झिंग्या सुनिल शेजवळ, याचे समाजविघातक कृत्यांना आळा घालण्यासाठी प्रचलीत कायदयान्वये करण्यांत आलेल्या प्रतिबंधक व हद्दपारीच्या कारवाया अपुऱ्या व कुचकामी ठरत होत्या. त्याचे गुन्हेगारी कृत्यांना प्रतिबंध होण्यासाठी पोलीस निरीक्षक, श्री.रणजित गलांडे, शिर्डी पोलीस स्टेशन एम.पी.डी.ए. कायदयान्वये प्रस्ताव तयार करुन श्री. अमोल भारती, उप विभागीय पोलीस अधिकारी, शिर्डी विभाग यांचे व श्री. सोमनाथ वाकचौरे, अपर पोलीस अधीक्षक, श्रीरामपुर यांच्या मार्फत आमचे कार्यालयात केला होता.

सदर प्रस्तावाची आम्ही बारकाईने पडताळणी करुन सदरचा प्रस्ताव हा शिफारस अहवालासह मा.जिल्हादंडाधिकारी, अहिल्यानगर यांना सादर केला होता. सराईत गुन्हेगार अनिकेत उर्फ झिंग्या सुनिल शेजवळ याचे विरुध्द खालील प्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

नमुद प्रस्तावांची व सोबतच्या कागदपत्रांची मा. डॉ.श्री.पंकज आशिया, जिल्हादंडाधिकारी, अहिल्यानगर यांनी पडताळणी करुन अहिल्यानगर जिल्हयातील सार्वजनीक सुव्यवस्था अबादित राहावी याकरीता सराईत गुन्हेगार अनिकेत उर्फ झिंग्या सुनिल शेजवळ, वय २८ वर्षे, रा. भिमनगर, शिर्डी, ता. राहाता,जि.अहिल्यानगर यांना स्थानबध्द करणे बाबतचे आदेश काढले असुन त्यास ताब्यात घेवुन नाशिक मध्यवर्ती कारागृह, नाशिक येथे स्थानबध्द केले आहे.

सदर कारवाई आमच्या मार्गदर्शनाखाली अपर पोलीस अधीक्षक, श्रीरामपुर श्री.सोमनाथ वाकचौरे, श्री.अमोल भारती, उप विभागीय पोलीस अधीकारी, शिर्डी विभाग, पोलीस निरीक्षक श्री.संतोष मुटकुळे, स्थानिक गुन्हे शाखा, अहिल्यानगर, पोलीस निरीक्षक, रणजित गलांडे, शिर्डी पोलीस स्टेशन व स्थानिक गुन्हे शाखा अहिल्यानगर येथील ■ पान ४ वर

## ९ ऑगस्टचा उपवर्गीकरणविरोधी मोर्चा ठरल्याप्रमाणेच होणार; अशोकराव गायकवाड यांना तीच खरी श्रद्धांजली

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या निर्णयाविरोधात येत्या ९ ऑगस्ट क्रांती दिनी आयोजित करण्यात आलेला जिल्हास्तरीय मोर्चा कोणत्याही परिस्थितीत ठरल्याप्रमाणेच पूर्ण ताकदीने काढण्यात येणार असल्याची माहिती स्वाभिमानी आंबेडकरी चळवळ व बौद्ध समाजाच्या वतीने देण्यात आली आहे.

संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, काही सोशल मीडिया ग्रुपवर हा मोर्चा स्थगित झाल्याच्या खोडसाळ पोस्ट प्रसारित केल्या जात आहेत. मात्र, हा मोर्चा कोणत्याही एका व्यक्तीचा नसून संपूर्ण समाजाचा आहे आणि तो स्थगित करण्याचा कोणताही निर्णय झालेला नाही. त्यामुळे समाजबांधवांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

संघटनेच्या मते, ९ ऑगस्ट क्रांती दिनाचे औचित्य साधून दिवंगत ज्येष्ठ नेते अशोकराव गायकवाड यांनी या मोर्चाचे नियोजन केले होते. त्यामुळे त्यांच्याच संकल्पानुसार ९ ऑगस्ट रोजी मोर्चा काढणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.

पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, हा मोर्चा कोणत्याही समाजाच्या विरोधात नसून अनुसूचित जातींमध्ये



उपवर्गीकरणाच्या निर्णयाला कारणीभूत ठरलेल्या भाजप-आरएसएसच्या धोरणांच्या विरोधात आहे. अनुसूचित जाती समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला. तसेच अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गाची वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन विद्यमान १३ टक्के आरक्षण वाढवून २५ टक्के करण्यात यावे, अशी प्रमुख मागणी या मोर्चातून करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

मोर्चाच्या तयारीला जिल्हाभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून मोठ्या संख्येने भीमसैनिक सहभागी होणार असल्याचा दावा आयोजकांनी केला आहे. सोशल मीडियावरील दिशाभूल करणाऱ्या पोस्टांकडे दुर्लक्ष करून मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, कापड बाजार परिसरात रस्त्याचे काम सुरू असल्यामुळे मोर्चाच्या पारंपरिक मार्गात बदल करण्यात आला आहे. हा मोर्चा डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथून सुरू होऊन छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, माळीवाडा, महात्मा फुले पुतळा, अशा टॉकीज चौक,

■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### नागरदेवळेत सोमवारी मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर




अहिल्यानगर - फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या वतीने संत सावता महाराज पुण्यतिथीनिमित्त सोमवारी, १० एप्रिल रोजी मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर नागरदेवळे येथील संत सावता महाराज मंदिर परिसरात पार पडणार आहे. या शिबिराचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन फिनिक्स सोशल फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे यांनी केले आहे. या शिबिरामध्ये तज्ज्ञ नेत्ररोग डॉक्टरांकडून अद्ययावत यंत्रसामग्रीच्या सहाय्याने मोफत नेत्र तपासणी करण्यात येणार आहे. यासोबतच जेष्ठ नागरिकांसाठी रक्तदाब, मधुमेह तसेच इतर आवश्यक आरोग्य तपासण्या देखील मोफत करण्यात येणार आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना एकाच ठिकाणी सर्वसमावेशक आरोग्य सेवा मिळणार आहे. नेत्र तपासणीनंतर ज्यांना शस्त्रक्रियेची आवश्यकता भासेल, अशा रुग्णांवर पुणे येथील के.के. आय बुधराणी हॉस्पिटलमध्ये मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. यामध्ये मोतीबिंदू, काचबिंदू तसेच लहान मुलांच्या तिरळेपणावरील शस्त्रक्रियांचा समावेश आहे. विशेष बाब म्हणजे, या शस्त्रक्रियेसाठी रुग्णांचे पुणे येथे येणे-जाणे, राहण्याची व जेवणाची संपूर्ण व्यवस्था मोफत करण्यात आली आहे. या शिबिरासाठी नाव नोंदणी करण्यासाठी किंवा अधिक माहितीसाठी जालिंदर बोरुडे (मो. ९८८१८१०३३३) या क्रमांकावर संपर्क साधावा, असे फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या वतीने सांगण्यात आले आहे.

### अजीज बशीर सय्यद यांचे निधन



अहिल्यानगर - मुकुंदनगर येथील रहिवासी अजीज बशीर सय्यद यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ७९ वर्षाचे होते. त्यांच्यावर लालटाकी येथील जलाल शाह बुखारी कब्रस्थानमध्ये दफनविधी करण्यात आली. या प्रसंगी विविध क्षेत्रातील नागरीक उपस्थित होते. कै. अजीज बशीर सय्यद हे रयत शिक्षण संस्थेचे हेड मास्टर होते. सामाजिक कार्यकर्ते फिरोज सय्यद यांचे वडील होते त्यांच्या मागे एक मुलगा, एक मुलगी, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. अजीजभाई हे धार्मिक व मनमिळावू स्वभावाचे होते. त्यांच्या निधनाने परिसरातून हळहळ व्यक्त केली जात आहे.

# आहिल्यानगरातून ‘आई’ चळवळीला नवी दिशा; क्रेडाईच्या मान्यवरांचा उत्स्फूर्त पाठिंबा

## मुक्ताई च्या माध्यमातून ‘आई’ चळवळीचा देशव्यापी विस्तार



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महाराष्ट्रामध्ये विविध सामाजिक उपक्रमांद्वारे उल्लेखनीय कार्य करणाऱ्या आणि आता देशभर विस्ताराच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या मुक्ताई सेवादल फाउंडेशनच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या ‘आई’ चळवळीला आहिल्यानगरमध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. समाजातील विविध क्षेत्रांतील प्रतिष्ठित मान्यवरांनी या चळवळीचे मनापासून स्वागत करत तिच्या उद्दिष्टांचे कौतुक केले.

यावेळी मुक्ताई सेवादल फाउंडेशनच्या प्रमुख सारिका पन्हाळकर महोत्रा यांनी ‘आई’ चळवळीची संकल्पना, तिच्यामागील सामाजिक भूमिका आणि ही चळवळ महाराष्ट्रातून संपूर्ण भारतात तसेच जगभर कशी पोहोचविण्यात येणार आहे, याचे प्रभावी सादरीकरण केले. आई, मातृत्व, कुटुंबव्यवस्था, संस्कार आणि सामाजिक बांधिलकी यांना केंद्रस्थानी ठेवून समाजात सकारात्मक परिवर्तन घडविण्याचा या चळवळीचा उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यांच्या सादरीकरणाला उपस्थितांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमात क्रेडाई महाराष्ट्रचे मानद सचिव तथा क्रेडाई आहिल्यानगर सल्लागार परिषदेचे सदस्य श्री. आशीष पोखरणा यांनी ‘आई’ चळवळीच्या संकल्पनेचे विशेष कौतुक करत या अभियानाचे अहिल्यानगर पालकत्व स्वीकारले. समाजात मूल्याधिष्ठित परिवर्तन घडविण्यासाठी अशा चळवळींची आज नितांत गरज असल्याचे त्यांनी सांगितले. भविष्यात या अभियानाला सर्वतोपरी सहकार्य करण्याची ग्वाहीही त्यांनी दिली.

याप्रसंगी क्रेडाई आहिल्यानगरचे मानद सचिव श्री. दीपक बांगर, उपाध्यक्ष श्री. सागर गांधी, उपाध्यक्ष श्री. अमित वाघमारे, मानद खजिनदार श्री. विक्रम जोशी, संयुक्त खजिनदार श्री. अमित फिरोदिया, संचालक श्री. मयूर कोठारी, संचालक श्री. संदीप भापकर, क्रेडाई महाराष्ट्र युवा विंगचे सहसंयोजक व क्रेडाई आहिल्यानगर युवा विंगचे समन्वयक श्री. धवल इंगळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

उपस्थित सर्व मान्यवरांनी ‘आई’ चळवळीची संकल्पना ही काळाची गरज असल्याचे सांगत या सामाजिक अभियानाला सक्रिय सहकार्य करण्याची भूमिका व्यक्त केली. महाराष्ट्रातून सुरू झालेली ही चळवळ संपूर्ण भारतात आणि पुढे जागतिक स्तरावर पोहोचून समाजात सकारात्मक परिवर्तन घडवेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी दादाभाऊ कळमकर यांची निवड

## पक्षबांधणीसाठी नव्या जबाबदारीची धुरा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी दादाभाऊ कळमकर यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमुळे पक्ष कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून विविध स्तरांतून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

या नियुक्तीबाबत पक्ष नेतृत्वाने दादाभाऊ कळमकर यांच्यावर विश्वास व्यक्त करताना, पक्षाची संघटनात्मक बांधणी अधिक सक्षम करण्यासाठी त्यांनी सर्व शक्तीनिशी योगदान द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. राज्यभर पक्षाची ताकद वाढविणे, तळागाळातील कार्यकर्त्यांना बळ देणे आणि समाजातील सर्व घटक व विविध संघटनांना सोबत घेऊन पक्षाचे ध्येय–धोरण प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

तसेच पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय शरदचंद्र पवार यांच्या विचारांचा प्रसार राज्याच्या कानाकोपऱ्यात करण्यासाठी सातत्याने कार्य करावे, अशा सूचनाही पक्ष नेतृत्वाने दिल्या आहेत.

दादाभाऊ कळमकर यांनी पक्ष नेतृत्वाने दाखविलेल्या विश्वासाबद्दल कृतज्ञता व्यक्त करत, पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी आणि सामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी प्रामाणिकपणे काम करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. या निवडीबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# स्व. अजितदादा पवार यांच्या विचारांना क्रीडांगणातूनही अभिवादन

## आमदार काशिनाथ दाते सरांच्या हस्ते विजेत्यांचा गौरव

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** स्व. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंती सप्ताहानिमित्त पारनेर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या विविध समाजोपयोगी उपक्रमांपैकी ‘‘स्व. अजितदादा पवार स्मृती चषक‘‘ पावसाळी क्रिकेट स्पर्धेचा अंतिम सामना व बक्षीस वितरण सोहळा राळेगण थेरपाळ येथे पार पडला. राष्ट्रवादी काँग्रेसच्या संकल्पनेतून पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेला खेळाडू व नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

स्पर्धेच्या अंतिम सामन्यात साईराम ११, शिरूर आणि मांडवगण फराटा या बलाढ्य संघांमध्ये रंगतदार लढत झाली. प्रथम फलंदाजी करत साईराम ११, शिरूर संघाने ७३ धावांचे आव्हान उभे केले. मात्र हे आव्हान समर्थपणे पेलत मांडवगण फराटा संघाने शानदार खेळी करत अंतिम सामना जिंकून ‘‘स्व. अजितदादा पवार स्मृती चषक‘‘ आपल्या नावावर केला. अंतिम सामन्याने उपस्थित क्रीडाप्रेमींना शेवटच्या क्षणापर्यंत खिळवून ठेवले.

स्पर्धेच्या अंतिम सामन्यास पारनेर–नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी उपस्थित राहून खेळाडूंना प्रोत्साहन दिले तसेच विजेत्या व उपविजेत्या संघांना पारितोषिकांचे वितरण केले. यावेळी त्यांनी ‘‘अमर रहे... अमर रहे... अजितदादा अमर रहे...! एकच वादा... अजितदादा...! राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा विजय असो...!‘‘ अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून सोडत उपस्थितांमध्ये नवचैतन्य निर्माण केले.



यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत, जिल्हा बँकेचे माजी संचालक प्रशांत गायकवाड, जिल्हा परिषदचे माजी सदस्य वसंतराव चेडे, जिल्हा सरचिटणीस सुधामती कवाद, लाडकी बहीण योजनेचे तालुकाध्यक्ष सुनील थोरात, नगरसेवक अशोक चेडे, तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर, दिनेश बाबर, उपाध्यक्षा रेश्मा गलांडे, रमेश वरखडे, स्वप्नील ठुबे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी आमदार काशिनाथ दाते म्हणाले, ‘‘स्वर्गीय अजितदादा पवार यांनी युवकांना नेतृत्व, विकास आणि समाजसेवेची प्रेरणा दिली. क्रीडा स्पर्धा केवळ मनोरंजनासाठी नसून युवकांमध्ये शिस्त, संघभावना आणि जिद्द निर्माण करणारे प्रभावी माध्यम आहे. अशा विधायक उपक्रमांमधून सक्षम व सुसंस्कृत पिढी घडते. विकास पवार व त्यांच्या सहकाऱ्यांनी केलेले उत्कृष्ट आयोजन निश्चितच कौतुकास्पद आहे.‘‘ यावेळी आमदार काशिनाथ दाते यांनी अंतिम फेरीत उत्कृष्ट खेळ करणाऱ्या साईराम ११, शिरूर आणि विजेता मांडवगण फराटा या दोन्ही संघांचे विशेष अभिनंदन केले. तसेच स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी आर्थिक सहकार्य करणारे सर्व दाते, प्रायोजक, संघमालक आणि सहकार्य करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे नावानिशी आभार मानत त्यांच्या योगदानाचे विशेष कौतुक केले. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी विकास पवार, नाणू सोनवणे, मोतीराम कारखिले, मयूर तिखोळे तसेच राळेगण थेरपाळच्या सर्व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. उत्कृष्ट नियोजन, भव्य पारितोषिके आणि शिस्तबद्ध व्यवस्थापनामुळे या स्पर्धेने तालुक्यात विशेष छाप पाडली असून, युवकांना विधायक दिशेने प्रेरित करणारा हा उपक्रम म्हणून सर्व स्तरांतून त्याचे कौतुक होत आहे.

> **‘स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आयोजित करण्यात आलेली ही क्रिकेट स्पर्धा म्हणजे युवकांना एकत्र आणणारा आणि त्यांच्या अंगी असलेल्या क्रीडा गुणांना वाव देणारा प्रेरणादायी उपक्रम आहे. विकास पवार आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी उत्कृष्ट नियोजन करून स्पर्धेला भव्य स्वरूप दिले आहे. आमदार मा. काशिनाथ दाते सर यांच्या मार्गदर्शनाखाली अशा विधायक उपक्रमांमधून राष्ट्रवादी काँग्रेस समाजहिताची आपली बांधिलकी अधिक प्रभावीपणे जपत आहे.’**
>
> **- अशोकराव सावंत**
> **(जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस)**

# त्रिदल माजी सैनिक सेवा संघाची स्थापना; माजी सैनिक मनसुख वाबळे यांचा ११ हजार रुपयांचा मदतीचा हात




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** त्रिदल माजी सैनिक सेवा संघाची स्थापना उत्साहात करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अशोक चौधरी होते. आमदार अक्षय कर्डिले व आमदार प्राजक्त तनपुरे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी आमदार अक्षय कर्डिले व आमदार प्राजक्त तनपुरे यांनी माजी सैनिकांच्या विविध समस्या शासनस्तरावर पाठपुरावा करून सोडविण्याचे आश्वासन दिले.

संघाच्या कार्यासाठी माजी सैनिक मनसुख वाबळे यांनी ११ हजार रुपयांचा धनादेश देऊन आर्थिक मदतीचा हात दिला.माजी सैनिक मनसुख वाबळे हे समाजकार्यात सातत्याने कार्यरत असून उद्योग–व्यवसायाच्या माध्यमातून समाजातील तळागाळातील गरजू व्यक्तींना नेहमीच मदतीचा हात देत असतात. माजी सैनिकांच्या कल्याणासाठी ते कायम पुढाकार घेत असून त्यांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी मार्गदर्शन करतात. त्यांच्या सुरक्षा गार्ड एजन्सीच्या माध्यमातून अनेक माजी सैनिकांना रोजगार उपलब्ध करून देत त्यांनी त्यांच्या सन्मानाने पुनर्वसनासाठी उल्लेखनीय योगदान दिले आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या अहिल्यानगर (दक्षिण) जिल्हाध्यक्षपदी प्रा.सीताराम काकडे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–**राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या अहिल्यानगर (दक्षिण) जिल्हाध्यक्षपदी प्रा.सीताराम काकडे यांची निवड करण्यात आली असून,त्यांना प्रदेशाध्यक्ष व राज्याचे माजी मंत्री आमदार शशिकांत शिंदे यांनी नियुक्तीचे पत्र दिले आहे.प्रा.सीताराम काकडे हे गेल्या अनेक वर्षापासून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये सक्रिय असून जिल्हा कार्यकारिणी सदस्य,जिल्हा सरचिटणीस,जिल्हा उपाध्यक्ष, बूथ समन्वय समितीचे जिल्हाध्यक्ष अशा विविध पदावर काम केलेले असून सध्या ते पक्षाचे कार्याध्यक्ष म्हणून कार्यरत होते.

विद्यार्थी दशेपासूनच सत्यशोधकी विचारधारेमध्ये जडणघडण झालेले झालेले प्रा. काकडे हे सामाजिक–राजकीय क्षेत्राबरोबरच साहित्य,संस्कृती, शिक्षण व आध्यात्मिक क्षेत्रात आजपर्यंत काम करत आलेले आहेत.त्यांची काही पुस्तके प्रकाशित असून आज पर्यंत त्यांनी महाराष्ट्रभर पाच हजारांहून अधिक प्रबोधन पर व्याख्याने दिलेली आहेत. तसेच अनेक वृत्तपत्रांच्या माध्यमातून प्रासंगिक लिखाण ते करत असतात. शिव–शाहू –फुले– आंबेडकर यांची पुरोगामी विचारधारा जपत असलेल्या प्रा.श्री. काकडे यांची शरदचंद्र पवार पक्षाच्या जिल्हाध्यक्षपदी झालेली निवड ही सामाजिक जाणीवे च्या भावनेतून काम करणाऱ्या एका प्रामाणिक कार्यकर्त्यासाठी मोठी संधी असल्याची भावना खासदार डॉ.निलेश लंके यांनी श्री.काकडे यांच्या निवडीनंतर व्यक्त केली. आहे. तर आज पर्यंत मी अनेक सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून सतत कार्यरत राहिलेला असून,पक्षाच्या या पदाचा उपयोग सर्वसामान्यांच्या समस्या सोडविण्यासाठी व संघटना वाढविण्यासाठी करणार असल्याचे प्रा.काकडे यांनी यावेळी सांगितले,तसेच पक्ष नेतृत्वाने माझ्यावर मोठा विश्वास दाखवून जिल्हाध्यक्षपदी काम करण्याची संधी दिल्याबद्दल पक्षाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्ष,संसद रत्न खासदार सुप्रियाताई सुळे,प्रदेशाध्यक्ष आमदार शशिकांत शिंदे,नगर दक्षिणचे खासदार डॉ. निलेश लंके,आमदार व पक्षाचे राज्य सरचिटणीस रोहित दादा पवार यांचे आभारही प्रा.काकडे यांनी मानले आहेत.

## शब्दकोडे क्रमांक : २४

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ■ | ४ | ५ | | ■ | ६ | ७ | |
| ८ | | ■ | ९ | | ■ | | ■ | १० | | | ■ |
| | ■ | ११ | | ■ | १२ | | | | | ■ | १३ |
| ■ | १४ | | | १५ | ■ | | ■ | | ■ | १६ | |
| १७ | | | ■ | १८ | | ■ | १९ | ■ | २० | ■ | |
| २१ | | ■ | २२ | | ■ | २३ | ■ | २४ | | २५ | |
| | ■ | २६ | | ■ | २७ | | २८ | ■ | २९ | | ■ |
| ■ | ३० | ■ | ३१ | ३२ | | ■ | ३३ | | ■ | ३४ | ३५ |
| ३६ | | ३७ | ■ | | ■ | ३८ | | ■ | ३९ | ■ | |
| | ■ | ४० | | ■ | ४१ | | ■ | ४२ | ■ | ४३ | ■ |
| ■ | ४४ | | ■ | ४५ | | ■ | ४६ | | ४७ | ■ | ४८ |
| ४९ | ■ | ५० | | ■ | ५१ | | | ■ | ५२ | | |

**<u>आडवे शब्द :</u>** १. परतफेड ४. इंग्रजीतील-जोक ६. जाडसर ८. वाळू ९. एक पाचक पेय १०. कर्म ११. करार १२. महात्मा गांधींच्या वास्तव्याने पावन झालेले गुजरातमधील एक आश्रम १४. तळहात १६. करम १७. धैर्य १८. भेट १९. इंग्रजीत-नाही २१. आशीर्वाद २२. शपथ २५. नूतन वा आश्चर्य २७. एक नशा आणणारे पेय २८. नारळापासून मिळते ३०. ठिकाण ३२. आखाती देशातील चलन ३४. वारसा ३५. उतार-विरुद्ध ३७. वाहन चालवणारा ३९. सागरात मिळणारा मौल्यवान दागिना ४०. होकार नाही-विरुद्ध ४१. ऐट ४२. कलिका ४४. गुजरातीत-दोन ही संख्या ४५. दर ४६. परमेश्वर ४७. बकरा ५०. एक मराठी नाटक ‘ती फुलराणी’ ५१. मग्न ५२. एक वाद्य ५३. हवेतील थंडावा **<u>उभे शब्द :</u>** १. पोलिसांची कवायत २. मदनाची स्त्री ३. दैना ५. एक महिना ६. ओहोटी-विरुद्ध ७. एक इंग्रजी मद्य १०. हिंदीत-कंबर ११. दया-हिंदीत १३. आंब्याची बाग १४. अतिरेक १५. आमिर खानचा एक सिनेमा १७. भगवंताचा वर्ण २०. पतीची दुसरी पत्नी २२. महाराष्ट्रातील एक स्थानिक जमात २४. मुद्दा २६. हाव २८.सखल-विरुद्ध २९. एक नक्षत्र ३१. भिंतीवर राहणारा एक जीव ३३. बर्फाळ प्रदेशात आढळणारा एक केसाळ प्राणी ३६. मेघ ३७. चतुर्थ, एक संख्या ३८. लग्नात करा घेऊन मिरवणारी ३९. लाकडाची बांधलेली मोट ४२. कावड ४३. श्वास घेण्याचे इंद्रिय ४७. लाकडाची लेखणी ४८. तबल्याचा साथीदार ४९. वारा

### शब्दकोडे क्रमांक : २३ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रा | ज | ग | ड | ■ | को | ठा | र | ■ | दै | नि | क |
| म | हा | ल | ■ | सा | य | ■ | वा | स | ना | ■ | वा |
| ■ | ल | ■ | पा | व | ■ | म | न | वा | ■ | जा | ड |
| घो | ■ | स | ■ | धा | क | ■ | गी | ■ | वा | म | ■ |
| ■ | अ | न | ब | न | ■ | ख | ■ | बी | ■ | न | ड |
| बो | ट | ■ | ल | ■ | बे | डू | क | ■ | ख | ग | ■ |
| ग | ■ | ह | वा | ला | ■ | स | म | र | ■ | र | ज |
| दा | व | ■ | न | व | खा | ■ | त | स | दी | ■ | वा |
| ■ | ल | हू | ■ | णी | ■ | श | र | द | ■ | मी | न |
| हो | य | ■ | नी | ■ | वी | र | ता | ■ | सं | त | ■ |
| का | ■ | मी | ■ | सं | ग | म | ■ | स | सा | ■ | खु |
| र | त | ■ | अं | ग | ■ | न | ट | ■ | र | सा | ळ |

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### ८ ऑगस्टला दिल्ली गेटवर 'मनुस्मृती धारणालयाशी राष्ट्रीय घटस्फोट'!

अहिल्यानगर - भारतीयांच्या मनामध्ये शतकानुशतके रुजविण्यात आलेली जन्माधारित विषमता, जातीय श्रेष्ठत्व, स्त्रीदास्य, अंधश्रद्धा आणि दैववाद यांना वैचारिक व नैतिक नकार देण्यासाठी पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसद यांच्या वतीने ८ ऑगस्ट २०२६ रोजी अहिल्यानगरच्या ऐतिहासिक दिल्ली गेट येथे 'मनुस्मृती धारणालयाशी राष्ट्रीय घटस्फोट' आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती ॲड. कारभारी गवळी यांनी दिली.हे आंदोलन माणसामाणसांत जन्माच्या आधारावर भेदभाव निर्माण करणाऱ्या कालबाह्य मानसिक संस्कारांविरुद्ध असल्याचे संघटनांनी स्पष्ट केले आहे. भारतीयांच्या धारणालयातून जातीय विषमता, स्त्रीदास्य, मतदास्य, अंधश्रद्धा आणि दैववादाच्या प्रवृत्ती दूर करण्यासाठी देशव्यापी लोकशिक्षण चळवळ उभारण्याचा संकल्प असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.याचवेळी 'राष्ट्रीय तिरंगा धारणालय उत्सव' साजरा करून भारतीय तिरंग्याला लोकशाही स्वशासनाच्या उन्नत मूल्यांचे जिवंत प्रतीक म्हणून जनतेसमोर मांडण्यात येणार आहे. तिरंग्यातील केशरी रंग लोकभक्तीचा, पांढरा रंग ज्ञानभक्तीचा, हिरवा रंग कर्मभक्तीचा; तर अशोकचक्र संविधानिक नैतिकता, समता, न्याय आणि कायद्याच्या राज्याचे प्रतीक म्हणून स्वीकारण्याचे आवाहन करण्यात येणार आहे. संघटनांच्या मते, प्रत्येक नागरिक, मतदार, लोकप्रतिनिधी आणि लोकसेवकाचे वैयक्तिक धारणालय हेच त्याच्या स्वशासनाचे अंतर्गत संविधान असते. हे धारणालय अपरिवर्तनीय नसून ज्ञान, अनुभव, आत्मपरीक्षण, न्यूरोप्लास्टिक अध्ययन आणि सजग रिकॉन्शिओ शासनाच्या माध्यमातून बदलता व उन्नत करता येते. स्वार्थी, जातीय आणि केंद्राभिमुख मानसिक शासनाच्या जागी लोककल्याण, विज्ञान, विवेक, कार्यक्षमता आणि संविधाननिष्ठतेवर आधारित रिकॉन्शिओ स्वशासन निर्माण झाले, तर भारतीय संसदीय लोकशाही केवळ मतदानाची व्यवस्था न राहता, सतत जागृत आणि लोककल्याणकारी जीवनपद्धती बनेल, अशी भूमिका यावेळी मांडण्यात येणार असल्याचे म्हंटले आहे.

### साई समर्थ हॉस्पिटल देखील गरीब रुग्णांची चांगली सेवा करेल - आ. सुरेश धस




अहिल्यानगर- समाजात डॉक्टरांवर रुग्णांचा दृढ विश्वास आहे. कारण डॉक्टर कधीही जात-पात न पाहता प्रत्येक रुग्णाची निःस्वार्थपणे सेवा करतात. जामखेड शहरातील विविध रुग्णालयांनी आपल्या दर्जेदार सेवेमुळे नागरिकांचा विश्वास संपादन केला असून, नव्याने सुरू झालेल्या 'साई समर्थ हाडांचा दवाखाना व एम.आर.आय. सेंटरच्या माध्यमातूनही गरीब व गरजू रुग्णांना चांगली, परवडणारी आणि दर्जेदार आरोग्यसेवा मिळेल, असा विश्वास आमदार सुरेश (आण्णा) धस यांनी व्यक्त केला. तर सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी हे खूप चांगलं सामाजिक काम करतात त्यांच्या आजोबा-पंजोबापासून सामाजिक कार्य सुरु असल्याचे कौतुक त्यांनी केले. जामखेड शहरातील अत्याधुनिक वैद्यकीय सुविधांनी सुसज्ज 'साई समर्थ हाडांचा दवाखाना व एम.आर.आय. सेंटर'चा शुभारंभ आमदार सुरेश (आण्णा) धस यांच्या हस्ते विविध मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला.. यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. या उद्घाटन समारंभास लोकनियुक्त नगराध्यक्षा प्रांजलताई अमित चिंतामणी, सामाजिक कार्यकर्ते संजय (काका) कोठारी, ज्येष्ठ नेते प्रा. मधुकर (आबा) राळेभात, सभापती शरद कार्ले, माजी सभापती डॉ. भगवान मुरुमकर, आर. पी.आय. जिल्हाध्यक्ष सुनील साळवे, पै. बबन (काका) काशिद, नगरसेवक प्रविण सानप, अमित चिंतामणी, सुनील कोठारी, राहुल उगले, गणेश डोंगरे, विकास (तात्या) राळेभात, हाडांचे तज्ज्ञ डॉ. अजय शिरसागर, एम.डी. मेडिसिन तज्ज्ञ डॉ. वैभव हुंबे, हॉस्पिटलचे संचालक डॉ. भरत दारकुंडे व डॉ. सोनाली दारकुंडे, रवींद्र भारस्कर, दीपक भोरे , क्षितिजा दिवटे ,यांच्यासह अनेक मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुढे आमदार सुरेश धस म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली गरीब रुग्णांच्या उपचारासाठी विविध शासकीय आरोग्य योजना प्रभावीपणे राबविल्या जात आहेत. साई समर्थ हॉस्पिटलनेही या योजनांचा लाभ अधिकाधिक गरजू रुग्णांपर्यंत पोहोचवावा. अनेक महागड्या शस्त्रक्रियाही शासनाच्या योजनांमधून मोफत होऊ शकतात. त्यामुळे रुग्णांना या योजनांची माहिती देणे आणि त्यांचा लाभ मिळवून देणे हीदेखील रुग्णालयाची सामाजिक जबाबदारी आहे. जामखेड नगरपरिषदेत स्वतंत्र वैद्यकीय कक्ष सुरू करण्याची गरज असून त्याचा फायदा अनेक गरजू नागरिकांना होईल. मदत करण्यासाठी माणुसकी आवश्यक असते आणि ती डॉ. भरत दारकुंडे यांच्यामध्ये असल्याचेही त्यांनी सांगितले.यावेळी बोलताना सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी म्हणाले की, आम्ही अपघातातील जखमीला बऱ्याचदा समर्थ हॉस्पिटल येथे आणले असता वर राज्यातील जे अपघातग्रस्त असतात त्यांच्याकडे पैसे नसतात यावेळी डॉक्टरांनी बऱ्याचदा पैसे कमी केले आहेत आणि गोरगरिबांना बिलाबद्दल ते मदत करतात असे त्यांनी स्पष्ट केले.



**एवरेस्ट अबॅकस नॅशनल लेवल कॉम्पिटिशनमध्ये आनंद विद्यालय गुलमोहर रोड, अहिल्यानगर विद्यार्थीनी तनिष्का विनोद क्षीरसागर ५१ वी नॅशनल लेवल कॉम्पिटिशनमध्ये विनर झाली असून तिला नम्रता गांधी मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले.या यशाबद्दल तिचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.**

# अहिल्यानगर शहराचा कला, क्रीडा, सांस्कृतिक व धार्मिक वारसा अशा कार्यक्रमांतून जपला जातो - आमदार संग्राम जगताप

**किशोर कुमार यांच्या ९७ व्या जयंतीनिमित्त 'प्यार दिवाना होता है' गीतमैफल हाऊसफुल; नगरकरांनी घेतला सदाबहार गीतांचा आनंद**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सदाबहार गायक स्वर्गीय किशोर कुमार यांच्या ९७ व्या जयंतीनिमित्त किशोर कुमार फॅन क्लब, पोलाद स्टील आणि विंटेज हिल्स यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेली 'प्यार दिवाना होता है' ही गीतमैफल रसिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात हाऊसफुल झाली. माऊली संकुल येथे आयोजित या कार्यक्रमाला नगरकरांनी मोठी गर्दी केली होती. जुन्या हिंदी चित्रपटसंगीताची सुवर्णपाने उलगडणाऱ्या या मैफलीत गायक इंजी. अजय दगडे आणि पुण्यातील प्रसिद्ध गायिका राधिका अत्रे यांच्या सुरेल सादरीकरणाने उपस्थित श्रोते मंत्रमुग्ध झाले. प्रत्येक गाण्यानंतर सभागृहात ''वन्स मोअर वन्स मोअर'' अशा घोषणांचा जल्लोष घुमत होता.

याच कार्यक्रमात यंदाचा 'किशोर कुमार सन्मित्र पुरस्कार' सुप्रसिद्ध हृदयरोगतज्ज्ञ डॉ. अभिजीत पाठक तसेच ज्येष्ठ सूत्रसंचालक प्रसाद बेडेकर यांना मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमास आमदार संग्राम जगताप, महापालिका आयुक्त यशवंत डांगे, पोलाद स्टीलचे अध्यक्ष जयेश मेहता, संजीवनी एज्युकेशन सोसायटीचे सुमित कोल्हे,




डॉ. बापूसाहेब कांडेकर, चे अध्यक्ष अभिजीत देवी, सुप्रसिद्ध चित्रकार प्रमोद कांबळे, आशिष पोखरणा, मयूर कोठारी, डॉ. हर्षवर्धन तनवर, अमोल खोले, किरण गवते, क्षितिज झावरे, प्रल्हाद जोशी, डॉ. रेणुका पाठक, डॉ. मुग्धा तनवर, अमित गटणे, करण भळगट, अभिषेक शेलार यांच्यासह फॅन क्लबचे सदस्य व रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदार संग्राम जगताप म्हणाले की, अहिल्यानगर शहराचा कला, क्रीडा, सांस्कृतिक आणि धार्मिक वारसा अशा दर्जेदार कार्यक्रमांच्या माध्यमातून जपला जात आहे. स्वर्गीय किशोर कुमार यांचा आवाज आजही प्रत्येक पिढीला तितकाच भावतो. व्यक्तीची खरी ओळख तिच्या विचारांतून आणि कर्तृत्वातून निर्माण होत असते. किशोर कुमार यांनी आपल्या गीतांच्या माध्यमातून लाखो रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवले असून त्यांच्या निधनानंतरही त्यांच्या स्वरांची जादू कायम आहे. किशोर कुमार फॅन क्लबचे गायक इंजी. अजय दगडे यांनी गेल्या १९ वर्षांपासून ही परंपरा अखंडपणे जिवंत ठेवली असून नगरकरांनीही त्यांना भरभरून प्रतिसाद दिला आहे. शहराच्या विकासाबरोबरच आपल्याला लाभलेला सांस्कृतिक वारसाही जपण्याची जबाबदारी सर्वांची असल्याचे त्यांनी सांगितले.

## अहिल्यानगरला इतिहास महाराष्ट्राचा महाअंतिम फेरी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** बालरंगभूमी परिषद, मध्यवर्ती, मुंबई आयोजित इतिहास महाराष्ट्राचा इतिहासातील एका थोर विभूतीस दरवर्षी हा महोत्सव समर्पित केला जातो. यंदाच्या वर्षी हा महोत्सव पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांना समर्पित करण्यात आला असून, राज्यभरातील २२ केंद्रांवर २३०० बाल कलावंतांनी यात आपली कला सादर केली. प्राथमिक फेरी केंद्रात झालेल्या या महोत्सवाची महाअंतिम फेरी घेण्याचा बहुमान बालरंगभूमी परिषद अहिल्यानगर शाखेला मिळाला आहे. ही महाअंतिम फेरी रविवार दि. ९ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजल्यापासून संध्याकाळी ६ वाजेपर्यंत माऊली सभागृह येथे संपन्न होणार आहे. यात महाराष्ट्रभरातून ४५० बाल कलावंत सहभागी होणार आहेत. अशी माहिती बालरंगभूमी परिषद मध्यवर्ती, मुंबई अध्यक्ष ॲड. नीलम शिर्के–सामंत यांनी दिली आहे

नाट्य, नृत्य, संगीत आदी कलांच्या माध्यमातून राष्ट्रीय पुरुषांची व थोर विभूतींची सखोल माहिती बालप्रेक्षकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचावी आणि बालकांना त्यातून प्रेरणा मिळावी, या प्रमुख उद्देशापोटी हा उपक्रम सातत्याने राबविला जात आहे. या महोत्सवात बालकलाकार नाट्य, नृत्य, गायन आणि वादनाच्या सादरीकरणातून पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे प्रेरणादायी जीवनकार्य मांडत आहेत. असे अभिनेत्री तथा अध्यक्ष ॲड.निलम शिर्के–सामंत सांगितले.

या स्पर्धा महोत्सवाचे स्वरूप तीन गटांत असून यामध्ये एकल लहान गट, मोठा गट आणि सांघिक गट अशा विविध प्रकारांत (एकपात्री, नाट्यछटा, स्वगत, गाणी व नृत्य) बालकलाकार रंगमंचावर आपली कला सादर करणार आहे.

संपूर्ण महाराष्ट्रात बृहन्मुंबई, अहिल्यानगर, जळगाव, नंदुरबार, जालना, नवी मुंबई, सोलापूर, पुणे, बीड, जळगाव, कोल्हापूर, लातूर, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, धुळे, कल्याण, ठाणे, मंगळवेढा, सोलापूर, सातारा, इचलकरंजी आदी केंद्रांवर प्राथमिक फेऱ्या पार पडल्या. यातून निवड झालेले ४५० हून अधिक बालकलाकार आता अहिल्यानगरमधील महाअंतिम फेरीत आमनेसामने असतील. या अंतिम फेरीचे परीक्षण ख्यातनाम अभिनेते व तज्ज्ञ परीक्षक संजय हळदीकर (कोल्हापूर), प्रा. डॉ. गणेश चंदनशिवे (मुंबई) आणि अभिनेते दिगंबर नाईक पाहणार आहेत, अशी माहिती महोत्सव प्रमुख दीपाली शेळके यांनी दिली.

## मंगल भक्त सेवा मंडळ ट्रस्टकडून विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जनता शिक्षण प्रसारक मंडळ, दहिगांव–ने संचलित काकासाहेब म्हस्के विद्यालय नागापूर, अहिल्यानगर येथे मंगल भक्त सेवा मंडळ ट्रस्ट, अहिल्यानगर यांच्या वतीने विद्यालयातील हुशार व होतकरू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना शालेय वह्या, शालेय दप्तर तसेच इतर आवश्यक शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना नव्या शैक्षणिक वर्षासाठी प्रोत्साहन मिळाले असून त्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे भाव उमटले.

यावेळी मंगल भक्त सेवा मंडळाचे सेवेकरी सुनील दळवी, पोपट होले, कीर्तीकुमार कोठारी, संतोष व्यवहारे, ओम आगरकर व ओम गिते हे प्रमुख उपस्थित होते. त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन विद्यालयाच्या प्राचार्या सो शीतल बांगर मॅडम व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सुनंदा धामणे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.यावेळी मंगल भक्त सेवा मंडळाच्या ट्रस्टचे सेवेकरी श्री संतोष व्यवहारे सर यांनी या ट्रस्टच्या माध्यमातून राबवल्या जाणाऱ्या उपक्रमांची माहिती विद्यार्थ्यांना दिली.

या कार्यक्रमास विद्यालयाच्या प्राचार्या सौ. शितल बांगर तसेच शिक्षिका सौ. रोहिणी वाघ या उपस्थित होत्या. विद्यालयाच्या प्राचार्या सौ. शितल बांगर मॅडम यांनी मंगल भक्त सेवा मंडळ ट्रस्टच्या या सामाजिक व शैक्षणिक उपक्रमाचे कौतुक करत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित करुन विद्यालयाच्या वतीने व संस्थेच्या वतीने मंगल भक्त सेवा मंडळ ट्रस्टचे आभार मानण्यात आले. या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी विद्यालयाचे शिक्षक श्री.नितीन म्हस्के सर,श्री.राजेंद्र पठारे सर,श्री.निलेश बांगर सर यांनी अथक परिश्रम घेतले.समाजातील दानशूर संस्था आणि सेवाभावी व्यक्तींच्या सहकार्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला बळ मिळत असून अशा उपक्रमांचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे.

## तारांगणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी अनुभवली विश्वाची रोमांचकारी सफर

**भूगोल ही जगाची खिडकी; वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी अशा उपक्रमांची गरज– प्राचार्य ज्ञानदेव बेरड**




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाविषयी आवड निर्माण होऊन खगोलशास्त्राबाबत जिज्ञासा वाढावी, तसेच वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित व्हावा या उद्देशाने भाग्योदय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात भाग्यश्री रोलिंग मिलच्या सहकार्याने इयत्ता पहिली ते बारावीच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी मोफत खगोलीय प्रदर्शन व कृत्रिम तारांगण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत विश्वाची अद्भुत सफर अनुभवली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यालयाचे प्राचार्य ज्ञानदेव बेरड, रेणुका माता विद्यालयाचे मुख्याध्यापक बन्सी नरवडे, ज्येष्ठ शिक्षक बाबासाहेब कोतकर, गोविंद कदम, भूगोल विभागाचे प्राध्यापक एकनाथ होले यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना प्राचार्य ज्ञानदेव बेरड म्हणाले, ''भूगोल ही जगाची खिडकी आहे. विद्यार्थ्यांनी पाठ्यपुस्तकापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष अनुभवातून विज्ञान समजून घेणे आवश्यक आहे. या तारांगणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना चंद्र, ग्रह, तारे, आकाशगंगा तसेच चांद्रयान–३ मोहिमेची माहिती प्रभावीपणे पाहता व समजता येत आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा, सृजनशीलता आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होतो. भविष्यात विज्ञान व अवकाश संशोधन क्षेत्रात करिअर करण्याची प्रेरणाही त्यांना मिळते.''

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. एकनाथ होले यांनी केले. त्यांनी कृत्रिम तारांगणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विश्व, ग्रह–तारे, सूर्य, चंद्र, आकाशगंगा तसेच चांद्रयान–३ मोहिमेची माहिती दृकश्राव्य पद्धतीने अनुभवता आली. अशा उपक्रमांमुळे विज्ञानातील नवनवीन संशोधनांची ओळख होऊन विद्यार्थ्यांच्या ज्ञानकक्षा अधिक व्यापक होतात. प्रत्येक विद्यार्थ्याने जिज्ञासू वृत्ती जोपासून विज्ञानाकडे सकारात्मक दृष्टीने पाहण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गोरख कांडेकर, दत्तात्रय पांडुळे, सोपान तोडमल, धनंजय बारगळ, संतोष काकडे, शिवाजी धस, आदिनाथ ठुबे, गणेश गायकवाड, बाळासाहेब कावरे, सुधाकर गायकवाड तसेच विद्यालयातील शिक्षक व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना अवकाश विज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव मिळाल्याने त्यांनी समाधान व्यक्त केले.

# मोदी सरकारने २७४ फरार आरोपींना भारतात परत आणून १७,८७४ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त केली

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अमित शाह यांच्या एकात्मिक, गुप्तचर माहितीवर आधारित आणि तंत्रज्ञानाचा वापर करणाऱ्या मॉडेलमुळे गेल्या ५ वर्षांत २७४ फरार आरोपींना भारतात परत आणण्यात यश मिळाले. मागील सरकारांमध्ये राजकीय इच्छाशक्तीचा अभाव होता; तर मोदी सरकारने २७४ फरार आरोपींना भारतात परत आणले.

एकेकाळी भारतात अशी धारणा होती की, आर्थिक गुन्हा करून परदेशात पळून गेलेले आरोपी पुन्हा कधीच कायद्याच्या ताब्यात येणार नाहीत. मोठमोठ्या घोटाळ्यांतील आरोपी अनेक वर्षे परदेशात सुरक्षित राहत असत आणि भारतीय तपास यंत्रणा त्यांना परत आणण्यासाठी प्रतीक्षा करत असल्याचे चित्र दिसत असे. मात्र, गेल्या काही वर्षांत ही परिस्थिती मोठ्या प्रमाणात बदलली आहे. आता संदेश स्पष्ट आहेगुन्हा भारतात झाला असेल आणि आरोपी जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात लपला असला, तरी कायदा त्याचा पाठलाग सोडणार नाही.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आणि केंद्रीय गृहमंत्री तथा सहकारमंत्री अमित शाह यांच्या मार्गदर्शनाखाली फरार आर्थिक गुन्हेगार कायदा ( ) प्रभावीपणे राबविण्यात आला. या व्यापक धोरणाअंतर्गत २०१९ पासून आतापर्यंत ३६ देशांतून २७४ फरार आरोपींना भारतात परत आणण्यात आले असून, १७,८७४ कोटी किमतीच्या मालमत्ता जप्त करण्यात आल्या आहेत. ही केवळ आकडेवारी नसून, राजकीय इच्छाशक्ती आणि ठाम निर्णयक्षमतेचे उदाहरण असल्याचे सांगितले जाते. सामान्य नागरिकाच्या दृष्टीने पाहिले, तर सर्वात मोठा बदल सरकारच्या दृष्टिकोनात दिसून येतो. यापूर्वीच्या सरकारांमध्ये फरार आरोपींना भारतात परत आणण्यासाठी आवश्यक राजकीय इच्छाशक्तीचा अभाव असल्याची टीका केली जात होती.



फरार आरोपींना कायद्याच्या कक्षेत आणण्यासाठी अमित शाह यांनी गृह मंत्रालयाच्या कामकाजात एकात्मिक, गुप्तचर माहितीवर आधारित आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणारे मॉडेल विकसित करण्यावर भर दिला. या पद्धतीमुळे विविध केंद्रीय तपास यंत्रणा, राज्य पोलिस, इंटरपोल, परराष्ट्र मंत्रालय आणि परदेशी सरकार यांच्यातील समन्वय अधिक मजबूत झाला. त्यामुळे अनेक वर्षे प्रलंबित असलेल्या प्रकरणांमध्येही लक्षणीय प्रगती झाल्याचे दिसून आले. अमित शाह यांची रणनीती केवळ फरार आरोपींना भारतात परत आणण्यापुरती मर्यादित राहिली नाही. त्यांनी जागतिक स्तरावरील कारवाई, मजबूत समन्वय आणि प्रभावी कूटनीती या तीन महत्त्वाच्या बाबींवर भर देत, फरार आरोपींच्या बेकायदेशीर आणि संशयास्पद मालमत्तांवरही कठोर कारवाई करण्यास गती दिली. १७,८७४ कोटीं रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आल्याने आता आर्थिक गुन्ह्यांमध्ये केवळ आरोपींना शिक्षा देणेच नव्हे, तर गुन्ह्यातून मिळवलेल्या संपत्तीवरही कायदेशीर कारवाई केली जात असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे आर्थिक गुन्हा करून परदेशात पळून गेल्यास संपत्ती सुरक्षित राहील, हा समजही खोटा ठरला आहे.

खरे तर फरार आर्थिक गुन्हेगार कायदा ( ) याच उद्देशाने तयार करण्यात आला होता. मोठे आर्थिक गुन्हेगार परदेशात राहून भारतीय न्यायव्यवस्थेपासून दूर राहू नयेत आणि कायदेशीर कारवाई टाळू नयेत, यासाठी या कायद्यात त्यांच्या मालमत्ता जप्त करण्याची तसेच त्यांना न्यायालयीन प्रक्रियेला सामोरे जाण्यास भाग पाडण्याची तरतूद करण्यात आली आहे. या कायद्याला ठाम राजकीय इच्छाशक्ती आणि प्रभावी अंमलबजावणीची जोड मिळाल्यानंतर त्याचे परिणामही दिसून येऊ लागले.

सामान्य नागरिकाच्या दृष्टीने हा बदल महत्त्वाचा आहे, कारण आर्थिक गुन्ह्यांचा फटका फक्त सरकारी तिजोरीलाच बसत नाही, तर बँका, गुंतवणूकदार, कर्मचारी आणि संपूर्ण देशाच्या अर्थव्यवस्थेलाही त्याचा मोठा परिणाम सहन करावा लागतो. अशा परिस्थितीत, नव्या भारताच्या सुरक्षा व्यवस्थेला नवी दिशा देणाऱ्या अमित शाह यांच्या धोरणामुळे आर्थिक गुन्हे हे केवळ पैशांशी संबंधित प्रकरण नसून ते देशाच्या हिताशी संबंधित महत्त्वाचे प्रकरण आहेत, हा विश्वास अधिक दृढ झाला.

इतकेच नव्हे, तर अमित शाह यांच्या नेतृत्वाखाली भारतपोलची सुरुवात करण्यात आली. या प्लॅटफॉर्मद्वारे १,४०० हून अधिक भारतीय यंत्रणा इंटरपोलशी जोडल्या गेल्या. गेल्या तीन वर्षांत ४०१ फरार गुन्हेगारांविरोधात नोटिसा जारी करण्यात आल्या. हे सर्व शक्य झाले कारण अमित शाह यांनी विविध यंत्रणांमधील समन्वय अधिक मजबूत केला. तसेच जागतिक स्तरावर पोलिस यंत्रणांमध्ये सहकार्य, संपर्क आणि समन्वय वाढवण्याचा संदेश दिला. या मोहिमेचा परिणाम केवळ कायद्याच्या अंमलबजावणीपुरता मर्यादित राहिला नाही, तर त्यातून एक ठोस संदेशही गेला. पूर्वी आर्थिक गुन्हा करून परदेशात पळून जाणे अनेक आरोपींसाठी सुरक्षित पर्याय मानला जात होता. मात्र, आता परिस्थिती बदलली आहे. भारतीय तपास यंत्रणा आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या मदतीने कितीही काळ कारवाई सुरू ठेवू शकतात, हे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे कायद्याची भीती आणि न्यायव्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ झाला आहे. कोणत्याही लोकशाहीत कायद्याचा सन्मान तेव्हाच वाढतो, जेव्हा तो प्रभावशाली व्यक्ती आणि सामान्य नागरिक या दोघांनाही समानपणे लागू होतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली विकसित झालेल्या या दृष्टिकोनाला आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या समन्वित कार्यपद्धतीला याचे श्रेय दिले जाते. या पद्धतीमुळे केवळ गुन्ह्यांची नोंद करून थांबण्याऐवजी आरोपींना न्यायालयापर्यंत आणण्याचा निर्धार अधोरेखित झाल्याचे सांगितले जाते.

आज ३६ देशांतून २७४ फरार आरोपींना भारतात परत आणणे आणि १७,८७४ कोटींच्या मालमत्ता जप्त करणे, ही केवळ सरकारी कामगिरी नसून कायद्याची पोहोच देशाच्या सीमांपलीकडेही प्रभावीपणे वाढल्याचे प्रतीक मानले जात आहे. अमित शाह यांच्या नेतृत्वाखाली ही मोहीम पुढेही सुरू राहील आणि येत्या काळात आणखी अनेक फरार आरोपींना न्यायालयासमोर उभे केले जाईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# पालकमंत्री ना. विखे पाटीलांचा ९ ऑगस्टला पारनेर दौरा

## आमदार काशिनाथ दातेंची माहिती

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पारनेर–** अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांचा रविवार, दि. ९ ऑगस्ट २०२६ रोजी पारनेर तालुक्यात महत्त्वपूर्ण दौरा आयोजित करण्यात आला असून, या दौऱ्यामुळे तालुक्यातील विकासकामांना नवी गती मिळणार असल्याचा विश्वास पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी व्यक्त केला आहे. तसेच महायुतीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी या दौऱ्यात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले.

या दौऱ्यादरम्यान दुपारी २.०० वाजता श्री गणेश मंगल कार्यालय, पारनेर येथे एस.आय.आर. संदर्भातील शासकीय आढावा बैठक, ३.०० वाजता पारनेर येथे त्याच ठिकाणी टंचाईबाबत आढावा बैठक, तसेच सायंकाळी ४.०० वाजता गांजी भोयरे ते पांढरे वस्ती रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे १४२.३९ लक्ष कामाचे भूमिपूजन आणि सायंकाळी ५.०० वाजता कुकडी डावा कालव्याच्या उर्वरीत दुरुस्ती करणे १६७.६६ कोटी कामांचे भूमिपूजन पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते संपन्न होणार आहे.

याबाबत आमदार काशिनाथ दाते म्हणाले, ''पारनेर तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध आहे. पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या दौऱ्यातून अनेक महत्त्वाच्या विकासकामांना चालना मिळणार असून, भविष्यातही तालुक्याच्या विकासासाठी आवश्यक निधी व योजना उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातील. हा दौरा पारनेरच्या विकासासाठी महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.'

यावेळी आमदार दाते यांनी महायुतीचे सर्व लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच तालुक्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विकासकामांचे साक्षीदार व्हावे, असे आवाहन केले.

# ह.भ.प. प्रभाताई भोंग यांच्या नेतृत्वाखाली श्री संत सावता महाराज पुण्यतिथीनिमित्त माळीवाडा येथे पारायण सोहळ्याला सुरुवात

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** माळीवाडा येथे श्री संत सावता महाराज पुण्यतिथीनिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताह व पारायण सोहळ्याला सुरुवात झाली असून या पवित्र कार्याचे नेतृत्व ह.भ.प. प्रभाताई भोंग या अत्यंत प्रेरणादायी स्वरूपात करीत आहेत. अध्यात्म, भक्ती आणि समाजप्रबोधन यांचे अद्वितीय त्रिवेणी संगम साधणाऱ्या या पारायण सोहळ्यात भक्तिरसाने भारलेले वातावरण निर्माण झाले आहे.

या पारायण सोहळ्याचे ज्ञानेश्वरी पूजन नगरसेविका पुष्पा बोरुडे ,सुरेखा कदम ,मंगल लोखंडे,उजवला शेरकर , अनिता खरपुडे ,सावेरी सत्रे ,आदी च्या हस्ते करण्यात आले. पारायण सोहळा भाविकांच्या श्रद्धेचा केंद्रबिंदू ठरत असून, महिलावर्गासह तरुणांमध्येही मोठ्या प्रमाणात सहभाग दिसून येत आहे. प्रभाताई भोंग यांच्या ओजस्वी



वाणीतील हरिपाठ, संतवाङ्मयाचे सादरीकरण, आणि सामाजिक जाणीवेने युक्त उपदेश यामुळे श्रोते मंत्रमुग्ध होत आहेत. त्यांनी संत सावता महाराजांच्या जीवनकार्याचा परामर्श घेत भक्तीमार्गातील सात्त्विकता व कर्मशीलतेचे महत्त्व अधोरेखित केले.

हा पारायण सोहळा उत्सव समितीचे प्रमुख छबूनाना जाधव , कैलास खरपुडे,चंद्रकांत ताठे ,अशोक कापरे आदींच्या मार्गदर्शनातून पार पडत आहे. त्यांच्या अनुभवसंपन्न नेतृत्वामुळे संपूर्ण सप्ताह उत्सव अत्यंत शिस्तबद्ध आणि भक्तिमय वातावरणात साजरा होत आहे.

पारायण, हरिपाठ, भजन, कीर्तन आणि महाराजांच्या शिकवणीवर आधारित व्याख्याने यामुळे संपूर्ण परिसर अध्यात्मिकतेने भारावून गेला आहे. अनेक भाविक सकाळपासून रात्रीपर्यंत कार्यक्रमात सहभागी होत असून, पुण्यस्मरणाच्या या पर्वाने माळीवाडा परिसराला भक्तिरसात चिंब भिजवले आहे.

येत्या काही दिवसांत नामवंत कीर्तनकार व प्रवचनकार यांच्या विचारांचे लाभ घेता येणार असून,श्री संत सावता महाराज यांच्या प्रेरणेने सुरू झालेला हा सप्ताह, समाजाला एकत्र आणणारा आणि आध्यात्मिक उन्नतीकडे नेणारा ठरतो आहे.

# आरोग्य शिबिराच्या माध्यमातून सेवेचा महाकुंभ सुरू–निर्मला बाफना

## ब्लडप्रेशर,डायबेटीज व सर्व रोग निदान शिबिरात १०५ रुग्णांची तपासणी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–**आनंदऋषीजी हॉस्पिटल हे आरोग्य मंदिर आहे.सध्याच्या युगात न परवडणारा औषधाचा खर्च यामुळे अनेक रुग्णांना उपचार मिळणे अवघड झाले आहे.मोफत आरोग्य शिबिरांमुळे अनेक गरजू रुग्णांना दिलासा मिळत आहे.आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये आरोग्य शिबिराच्या माध्यमातून सेवेचा महाकुंभ सुरू आहे.असे प्रतिपादन निर्मल ग्रुपच्या श्रीमती निर्मला बाफना यांनी केले आहे.

जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे राष्ट्रसंत श्री आनंदऋषीजी म.सा.यांच्या १२६ व्या जन्मदिनानिमित्त ब्लड प्रेशर डायबेटीज व इतर सर्व आजारांवर निदान चिकित्सा व साथीचे आजार व सर्व रोग निदान शिबिराचे आयोजन स्व.रमेशचंद्र बाफना व स्व. राहुल बाफना यांच्या स्मृतिप्रित्यर्थ बाफना परिवाराच्या वतीने करण्यात आले होते.यावेळी शिबिराचे उद्घाटन श्रीमती निर्मला बाफना व बाफना परीवार यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून करण्यात आले.याप्रसंगी संतोष बाफना,सौ.रूपाली बाफना, ऋषभ बाफना,सौरभ बाफना तसेच जैन सोशल फेडरेशनचे संतोष बोथरा,माणकचंद कटारीया,अभय गुगळे,सुभाष मुनोत,वसंत चोपडा, डॉ.आशिष भंडारी,प्रकाश छल्लाणी,शिबिराचे तज्ञ डॉक्टर डॉ.वसंत कटारिया, डॉ. गजेंद्र गिरी,डॉ.प्राजक्ता पारधे,डॉ.स्वप्नील शिंदे आदी उपस्थित होते.



सौ.रुपाली बाफना म्हणाले, जैन सोशल फेडरेशनने रुग्णसेवेच्या कार्यात बाफना परिवाराला सहभागी करून घेतले आहे.हे मी बाफना परिवाराचे भाग्य समजते.येथे येणाऱ्या रुग्णांना उत्तम आरोग्य सेवा मिळावी. यासाठी येथील सर्व डॉक्टर्स नर्सेस व स्टाफ निस्वार्थपणे आरोग्य सेवा देत आहेत. आनंदऋषीजी हॉस्पिटलचे सेवेचे कार्य अविरतपणे सुरू आहे.येथे येणार्या रुग्णांच्या चेहऱ्यावरचे हसू कायम राहो. सर्वांचा स्नेह व सहयोग सदा राहो.

प्रास्ताविकात संतोष बोथरा म्हणाले,बाफना परिवारा सारख्या दानशूर परिवारांच्या सहकार्याने आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे मोठ्या प्रमाणात आरोग्य शिबिरे भरविले जात आहेत. स्व.रमेशशेठ बाफना यांनी प्रतिकूल परिस्थितीत ४५ वर्षांपूर्वी निर्मल ॲडव्हर्टायिझिंग हा व्यवसाय सुरू केला.बाफना परिवार हा पूर्वीपासूनच सामाजिक कार्यात अग्रेसर आहे.तसेच आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या सेवा प्रकल्पात ही बाफना परिवार पूर्वीपासून जोडला गेलेला आहे.जिथे कमी तिथे आम्ही याप्रमाणे बाफना परिवार नेहमीच सहकार्य करीत आहे.आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या कार्यात बाफना परिवारासारखे असंख्य परिवार सहभागी झाल्याने

आनंदऋषीजी हॉस्पिटलचे ''न भुतो न भविष्यती'' असे काम उभे राहिले आहे.

डॉ.प्राजक्ता पारधे म्हणाले, उत्तम आरोग्य जीवनशैली जगण्यासाठी प्रत्येकाने वेळोवेळी आरोग्याची तपासणी करणे आवश्यक आहे.कोणताही आजार होऊ नये.यासाठी प्रतिबंधात्मक उपाय करणे आवश्यक असतात.बीपी,शुगर,डायबेटीज तसेच सर्दी तसेच साथींचे आजार यासाठी रुग्णांनी काळजी घेणे आवश्यक आहे.आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या आरोग्य शिबिराचा गरजू रुग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आशिष भंडारी यांनी केले.तर आभार प्रकाश छल्लाणी यांनी मानले. या शिबिरात १०५ रुग्णांची तपासणी करण्यात आली.

# १५ दिवसांत चौकशीचे लेखी आश्वासन; आडूळमधील आमरण उपोषण मागे



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**आडूळ –** पैठण तालुक्यातील आडूळ बुद्रुक ग्रामपंचायतीतील कथित आर्थिक गैरव्यवहाराच्या चौकशीच्या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते सचिन चव्हाण यांनी सुरू केलेले आमरण उपोषण प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर मागे घेण्यात आले. कथित गैरव्यवहाराची १५ दिवसांत चौकशी करून वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे अहवाल सादर केला जाईल, असे लेखी आश्वासन उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रहार ढोकणे यांनी दिले.

या आंदोलनाला ग्रामस्थ, व्यापारी तसेच ग्रामपंचायत सदस्यांचा मोठा पाठिंबा लाभला. त्यानंतर गटविकास अधिकारी मनोरमा गायकवाड, गट सहाय्यक अधिकारी राजेश कांबळे, विस्तार अधिकारी बळीराम राठोड आणि शाखा अभियंता ऋषभ धुमाळ यांनी आंदोलकांशी चर्चा केली. सकारात्मक चर्चेनंतर प्रशासनाने लेखी आश्वासन दिल्यानंतर उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रहार ढोकणे यांच्या हस्ते सचिन चव्हाण यांना ज्यूस पाजून उपोषणाची सांगता करण्यात आली.

यावेळी रूपाली अभिजित तवार, शुभम पिवळ, कासाबाई कोल्हे, ज्योती पठाडे, भाऊसाहेब पिवळ, जाहेर शेख, बबन भावले, नारायण पडूळे, नारायण पिवळ, मोहसीन तांबोळी, अशोक भावले, अश्पाक पठाण, हारुण पठाण यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. आंदोलनादरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी सहायक पोलिस निरीक्षक सचिन पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला.

# शेतीच्या वादातून पैठणात दोन गट आमनेसामने; दोन्ही बाजूंकडून परस्परविरोधी गुन्हे दाखल

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण –** पैठण शहरालगत गट क्रमांक ८६ मधील शेतीच्या मालकीच्या वादाने हिंसक वळण घेतल्याने दोन गट आमनेसामने आले. कुऱ्हाड, चाकू, लोखंडी पाइप, दांडे व लाठ्याकाठ्यांनी हल्ला करून गंभीर दुखापत केल्याचे आरोप दोन्ही बाजूंनी करण्यात आले असून, पैठण पोलीस ठाण्यात परस्परविरोधी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुन्हा क्र. ३०२/२०२६ मध्ये नेहरू चौक येथील जमील ईसाक खाटीक (कुरेशी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अबरार गुलामनबी कुरेशी व अन्य सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीनुसार, गट क्रमांक ८६ मधील ११ एकर शेतीपैकी दीड एकर जमिनीच्या वादातून आरोपींनी फिर्यादीला शेतात बोलावून शिवीगाळ व मारहाण केली. दांड्याने मारहाण




केल्यानंतर कुऱ्हाडीने डोक्यावर वार करून गंभीर दुखापत केल्याचा आरोप आहे. मध्यस्थी करण्यासाठी गेलेल्या रिजवान यालाही कुऱ्हाडीने मारहाण करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे. तसेच ६ ऑगस्ट रोजी पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी जात असताना आरोपींनी पुन्हा शिवीगाळ करत चाकूने हल्ल्याचा प्रयत्न केल्याचाही आरोप करण्यात आला आहे.

दुसरीकडे, गुन्हा क्र. ३०३/२०२६ मध्ये ग्रीन चौक येथील अबरार गुलामनबी कुरेशी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून जमील ईसाक कुरेशी व अन्य चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीनुसार, शेतीतील सोलार कंपाउंडजवळील आंबा व नारळाच्या झाडांवर ताबा घेण्याच्या कारणावरून वाद झाला. त्यावेळी आरोपींनी शिवीगाळ करून कुऱ्हाडीने डोक्यात वार केला, तसेच लोखंडी पाइप व लाठ्यांनी मारहाण करून जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या. यानंतर ६ ऑगस्ट रोजी फिर्यादीच्या घरासमोर येऊन पुन्हा शिवीगाळ व मारहाण केल्याचाही आरोप करण्यात आला आहे. दोन्ही गुन्हे भारतीय न्याय संहिता (बीएनएस) अंतर्गत दाखल करण्यात आले असून, या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक तळेकर करीत आहेत. शेतीच्या वादातून घडलेल्या या घटनेमुळे पैठण परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

# मैत्रीचे ऋणानुबंध असेच असतात; अनोळखी माणसांना आपलंसं करणारे!

मित्रांनो, मैत्री कधी, कुठे आणि कोणाशी होईल हे सांगता येत नाही पण काही माणसं आयुष्यात येतात आणि नकळत आपल्या मनात कायमची जागा करून जातात.
मागील वर्षी आमच्या दुकानात बसलेला आमचा लाडका कुत्रा ''मॅक्स'' पाहून कलकत्त्याहून आलेले पार्थ सरकार आणि त्यांची पत्नी सीमा आमच्या दुकानात आले होते. मॅक्सबरोबर त्यांनी अगदी मनमोकळेपणाने फोटो काढले आणि त्या छोट्याशा भेटीतून आमची ओळख झाली. त्या भेटीतच एक वेगळाच आपलेपणा निर्माण झाला. त्यावेळी माझ्या घरी 'गौरी-गणपतीचा' सण असल्यामुळे त्यांना जेवण केल्याशिवाय जाऊ द्यायचे नाही, असा मी आग्रह केला. माझ्या घरून त्यांच्यासाठी प्रेमाने जेवण करून त्यांना पाठवले.
कदाचित तो एक छोटासा प्रसंग होता पण त्यातून निर्माण झालेली मैत्री मात्र गेल्या



वर्षभरात खूप घट्ट होत गेली.
आज त्याच मैत्रीचा एक सुंदर अनुभव पुन्हा आला.
माझा भाऊ देवदत्त सध्या कलकत्ता दौऱ्यावर असून, त्याच्यासोबत छत्रपती संभाजीनगर येथील माझा भाचा गणेश, त्याचा मेहुणा व्यंकटेश आणि माझा जिवलग मित्र ऋषिकेश हे देखील आहेत. या सर्वांनी मिळून पार्थजींच्या घरी भेट दिली. पार्थजींनी सर्वांचे अगदी घरच्यांसारखे प्रेमाने स्वागत करून मनापासून पाहुणचार केला.
विशेष म्हणजे देवदत्त, गणेश, व्यंकटेश, ऋषिकेश आणि पार्थजी यांनी एकत्रितपणे अतिशय सुंदर गाणीही सादर केली.
हा सगळा क्षण पाहताना मनात एकच विचार आला मैत्रीला ना अंतराचं बंधन असतं, ना भाषेचं, ना प्रांताचं मैत्री फक्त मनाने जुळते!
गेल्या वर्षी आमच्या दुकानात आमचा लाडका कुत्रा मॅक्स याच्यामुळे सुरू झालेली एक छोटीशी ओळख आज दोन कुटुंबांमधील आपुलकीच्या नात्यात बदलली आहे, यापेक्षा सुंदर ऋणानुबंध आणखी काय असू शकतात? कधी कधी नाती रक्ताची नसतात, ती मनाची असतात आणि अशी मनाची नाती आयुष्यभराची सोबत बनतात.
'मैत्रीचे हे सुंदर ऋणानुबंध असेच कायम राहोत!'

**श्रीपाद शहाणे**

(पान १ वरून)

## श्रमिक संघटना व ऑटो-रिक्षा संघटनेचा १५ ऑगस्टपासून आंदोलनाचा इशारा

प्रमाणावर विनापरवाना, स्क्रॅप अथवा नियमबाह्य रिक्षा प्रवासी वाहतूक करत असल्याचा आरोप करत अशा वाहनांवर तातडीने कारवाई करून ती कायमस्वरूपी बंद करण्यात यावीत, अशी मागणी करण्यात आली आहे. वाहतूक शाखेतील काही अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून कथित हप्तेवसुली होत असून त्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षेशी तडजोड केली जात असल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. या प्रकरणाची राज्य गुन्हे अन्वेषण विभागामार्फत (सीआयडी) चौकशी करण्यात यावी, अशी मागणी संघटनेने केली आहे.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या खासगी बस, मारुती व्हॅन व इतर वाहनांकडूनही कथित हप्तेवसुली होत असल्याचा आरोप करत संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मोबाईल कॉल डिटेल्सची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच ओव्हरलोड वाहनांकडून मोठ्या प्रमाणात हप्ते घेतले जात असल्याचाही दावा निवेदनात करण्यात आला आहे.

आरटीओ कार्यालयात काही एजंट पिढ्यानपिढ्या कार्यरत असून त्यांच्या माध्यमातून वाहनधारकांची आर्थिक पिळवणूक होत असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. तसेच बनावट विमा (डुप्लिकेट इन्शुरन्स) प्रकरणाची चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर निलंबनासह कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

संघटनेने निवेदनात इशारा देताना म्हटले आहे की, मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास १५ ऑगस्ट २०२६ पासून अहिल्यानगर शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर काळ्या फिती लावून बेमुदत आमरण उपोषण करण्यात येईल. तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्या १५ ऑगस्ट च्या दौऱ्यावेळी त्यांना काळे झेंडे दाखविण्यात येतील, असा इशाराही देण्यात आला आहे.
निवेदन देताना विलास कराळे पाटील यांच्यासमवेत नासिर खान, बाळासाहेब साळवे, अन्वर शेख, जावेद शेख, आसिफ सय्यद, दिलावर सय्यद, ज्ञानेश्वर शिपणकर, महेश सुतार, बाबा दहिफळे, गणेश पारखे, यशराज बनसोडे, जॉन भालेराव, आसिफ शेख, सिताराम आंबेकर, तौफिक अत्तार, फारुख शेख, गोरख सुरंगे, सोपान दळवी, किशोर कुलट, अकिल रज्जाक, विष्णू दहातोंडे, निलेश मिसाळ, सिद्धांत भिंगारदिवे, आकाश वैरागर, अभिषेक सकट, ईश्वर लंगारे, विकास आव्हाड आदींसह संघटनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मंगळसूत्र चोरणारे दोन सराईत चोरटे गजाआड

त्यांना पत्ता विचारण्याचा बहाणा करत त्यांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने व मंगळसूत्र बळजबरीने ओरबाडून पोबारा केला. याप्रकरणी संगमनेर तालुका पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३०९(६) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. जिल्ह्यातील उघडकीस न आलेल्या जबरी चोरीच्या गुन्ह्यांचा शोध घेण्याचे निर्देश पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी दिले होते.
त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि विकास जाधव आणि त्यांच्या पथकाने गुप्त बातमीदार व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तपास सुरू केला.
दिनांक ६ ऑगस्ट रोजी मिळालेल्या माहितीनुसार पथकाने कोऱ्हाळे (ता. राहाता) येथे छापा टाकून
हर्षल राजेंद्र भांबारे (वय २१, रा. कोऱ्हाळे, ता. राहाता) व नघलेश विलास गायकवाड (वय २७, रा. कोऱ्हाळे, ता. राहाता) यांना ताब्यात घेतले.
चौकशीदरम्यान आरोपींनी बलेनो कारचा (क्रमांक –१७– –४८६२) वापर करून हा गुन्हा केल्याची कबुली दिली. पोलिसांनी ६ लाख रुपये किमतीची गाडी जप्त करून दोन्ही आरोपींना पुढील तपासासाठी संगमनेर तालुका पोलीस ठाण्याच्या स्वाधीन केले आहे.

## शिर्डी शहरात व परीसरात दहशत निर्माण कराणारा सराईत गुन्हेगार एमपीडीए कायदयान्वये स्थानबध्द जिल्हादंडाधिकारी आदेश

स.फौ. रविंद्र पांडे, पोहेकॉ सुयोग सुपेकर, मपोकॉ सुनिता पवार यांनी केली आहे.

अहिल्यानगर जिल्हयातील समाजामध्ये अशांतता पसरवणारे सराईत गुन्हेगार, वाळु तस्कर तसेच संघटीतपणे गुन्हे करणा-या टोळीच्या हालचालीवर लक्ष ठेवण्यात येत असुन त्यांचेवर प्रचलित कायदयान्वये कठोर कारवाई करण्याचे संकेत आम्ही व मा.डॉ.श्री. पंकज आशिया, जिल्हादंडाधिकारी, अहिल्यानगर यांनी दिलेले आहेत.

## ९ ऑगस्टचा उपवर्गीकरणविरोधी मोर्चा ठरल्याप्रमाणेच होणार; अशोकराव गायकवाड यांना तीच खरी श्रद्धांजली

माणिक चौक, अर्बन बँक, नवी पेठ, चितळे रोड, दिल्ली गेट मार्गे नीलक्रांती चौक येथे समारोप होणार आहे.

या मोर्चामध्ये लाँग मार्चचे प्रणेते आयु. सिद्धार्थ शिंगारे, भीम टायगरचे राष्ट्रीय अध्यक्ष दादासाहेब शेळके, राजूभाऊ थाटे, सिद्धार्थ दादा सुरडकर यांच्यासह विविध आंबेडकरी संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे. शहर व जिल्ह्यातील सर्व भीमसैनिक, आंबेडकरी अनुयायी आणि बौद्ध समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन स्वाभिमानी आंबेडकरी चळवळ व बौद्ध समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.